मायक्रोसॉफ्ट सॉफ्टवेअरच्या प्रणालीत काल झालेला तांत्रिक बिघाड हळूहळू सोडवण्यात येत आहे, मात्र, सर्व यंत्रणा सुरळीत होण्यास आणखी काही वेळ लागेल, असं मायक्रोसॉफ्टची सहयोगी कंपनी क्राउडस्ट्राइकच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.

मायक्रोसॉफ्ट कंपनीचे सर्व तज्ज्ञ काम पुन्हा सुरळीत करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करत असून ग्राहकांना तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असं मायक्रोसॉफ्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्य नारायण नडेला यांनी सांगितलं आहे.

दरम्यान, जागतिक आउटेजबाबत सरकार मायक्रोसॉफ्टशी संपर्कात असून या बिघाडामागचं कारण सापडल्याची माहिती, केंद्रीय माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाजमाध्यमावर दिली आहे.

विमानतळांवरची एअरलाईन कार्यप्रणाली पूर्ववत झाली असून हवाई वाहतूक सुरळीत सुरु झाल्याचं नागरी उड्डाण मंत्रालयानं आज स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

संसदेच्या सोमवारपासून सुरू होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारनं उद्या सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत चालण्यासाठी सर्व पक्षांनी सहकार्य करावं, या दृष्टीनं या बैठकीत चर्चा होईल. संसदेचं हे अधिवेशन १२ ऑगस्टपर्यंत चालेल. केंद्रीय अर्थसंकल्प २३ जुलै रोजी सादर होणार आहे.

**<><><><><>**

UPSC अर्थात केंद्रिय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष मनोज सोनी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. आपला राजीनामा त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी

मुर्मू यांच्याकडे सुपूर्द केला आहे. त्यांचा कार्यकाळ २०२९ मध्ये संपणार होता, पण आपल्या वैयक्तिक कारणांसाठी त्यांनी राजीनामा देत असल्याचं सांगितलं.

<><><><><>

धारावी झोपडपट्टीतला भूखंड अदानी समूहाला देऊन मुंबईला अदानी सिटी करण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा डाव असल्याची टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते.

धारावीच्या पुनर्वसन प्रकल्पाबद्दल धारावीकरांना त्यांच्या हक्काचं घर मिळायला हवं, ही आपल्या पक्षाची भूमिका आहे. धारावीकरांना अपात्र ठरवून त्यांना हाकलण्याचा डाव असल्याचा आरोप ठाकरे यांनी केला. या प्रकल्पासाठी वाढीव एफएसआय दिला जात असून नागरी संतुलन बिघडवलं जात असल्याचंही ठाकरे म्हणाले.

<><><><><>

पुण्यात उद्या होणाऱ्या भाजपाच्या अधिवेशनात ५ हजार ३०० प्रतिनिधी उपस्थित राहणार असल्याची माहिती भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. महाविकास आघाडी सत्तेत आल्यास महायुतीनं नागरिकांच्या कल्याणासाठी सुरु केलेल्या सर्व योजना ते बंद करतील, असं बावनकुळे म्हणाले.

<><><><><>

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावांपैकी ‘तुळशी तलाव’ आज सकाळी साडेआठ वाजता पूर्ण भरुन वाहू लागला आहे. या तलावाची पाणी धरणक्षमता ८ हजार ४६ दशलक्ष लीटर इतकी आहे. तुळशी

तलावातून दररोज सरासरी १८ दशलक्ष लीटर एवढ्या पाण्याचा पुरवठा केला जातो.

**<><><><>**

गोंदिया जिल्ह्यात शेतात काम करत असताना दोन वेगवेगळ्या ठिकाणी पुराच्या पाण्यात अडकलेल्या चार जणांना बचाव पथकानं सुखरूप बाहेर काढलं आहे. सडक अर्जुनी तालुक्यातल्या दलली गावात शेतात काम करणारे दोन मित्र पुरात अडकले होते. तर पिपरी गावात वडील आणि मुलगा नदीचं पाणी शेतात शिरल्यानं अडकले होते.

**<><><><>**

मुंबईतल्या ग्रँड रोड पश्चिमेला स्टेशनलगत असलेल्या रुबीनिस्सा मंजिल या चार मजली इमारतीचा काही भाग आज सकाळी ११ वाजताच्या सुमारास कोसळला. यात कुठलीही जीवितहानी झाली नाही. अग्निशमन दलानं बचावकार्य सुरू केलं आहे. पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी घटनास्थळाला भेट दिली आहे.

**<><><><>**

**राज्यात** आज अनेक जिल्ह्यात पावसानं जोरदार हजेरी लावली. **रायगड, साताऱ्यातील घाट परिसर, नागपूर, वर्धा आणि चंद्रपूर** जिल्ह्यासाठी आज रेड अलर्ट हवामान विभागानं जारी केला आहे.

**विदर्भात** अनेक ठिकाणी रात्रीपासून मुसळधार पाऊस झाला.

**नागपूरमध्ये** पावसामुळे सखल भागात आज सकाळी पाणी साचलं. त्याचा परिणाम वाहतुकीवर झाल्यानं चाकरमान्यांची तारांबळ उडाली. **नागपूर आणि भंडारा** जिल्ह्यातल्या सर्व शाळा- महाविद्यालयांना आज सुट्टी जाहीर करण्यात

आली. आज सकाळी साडेआठ ते साडेअकरा या कालावधीत १३५ मिलिमीटरहून अधिक पावसाची नोंद करण्यात आली आहे.

**चंद्रपूर** शहरालगतच्या इरई धरणात मोठ्या प्रमाणात आवक सुरु असून धरणाची दोन दारं दुपारपर्यंत उघडली जाणार असल्यानं धरणाच्या खालच्या भागातल्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**अमरावती** जिल्ह्यात संततधार पावसामुळे अचलपूर, चांदूरबाजार इथल्या अनेक गावांमध्ये तसंच बडनेरा शहरात पाणी साचलं. मेळघाटातले अनेक नदीनाले दुथडी भरून वाहत असल्यानं काही गावांचा संपर्क तुटला.

**भंडारा** जिल्ह्यातील गोसेखुर्द धरणातून ५ हजार क्यूसेक्सपर्यंत पाण्याचा विसर्ग वाढवण्यात येणार असल्यानं नदीकाठावरील गावांनी सतर्क राहण्याचा इशारा जिल्हा प्रशासनानं दिला आहे.

**गडचिरोली** जिल्ह्यात रात्रीपासून मुसळधार पावसामुळे भामरागडजवळच्या पर्लकोटा नदीला पूर आला. आलापल्ली-भामरागड, भामरागड-एटापल्लीसह चौदा मार्गांवरची वाहतूक ठप्प झाली.

**रायगड** जिल्ह्यात सर्व नद्यांना पूर आले असून रोह्यात कुंडलिका नदीनं धोक्याची पातळी ओलांडली आहे. रोह्याजवळ भिसे खिंडीत दरड कोसळली आहे.

**//<><><><><>//**